**KI KELKAR**

**INVESTMENT COUNSULTANTS**

All Investment Needs One Destination




Office : 104 Shree Gajanan Prasad Soc. Prabhat Rd. Lane No 14, Anand Colony, Pune - 411 004.

www.kelkarinvestments.com

9822742277 / 8087042787 kelkar.r@gmail.com

GET IT ON Google Play



RNI. : MAHMAR / 2011 / 43064

।। श्री विश्वकर्मणें नमः।।

स्थापना: १९९५

भारत सरकार मान्यताप्राप्त

Posted at Patrica Channel STG.Office,GPO,Mumbai-01.
Published on 7th of Every Month
Posting Date: 7th/8th of Every Month


# विश्वकर्मा पंचाल

*महाराष्ट्रव्यापी पंचाल सुवर्णकारांचे एकमेव बुलंद मासिक*


vpmonthly@gmail.com

उपसंपादक - सुनिल स. सागवेकर    उपसंपादक - मोहन ह. नगरकर    उपसंपादक - अतुल रा. देवरुखकर


**विश्वकर्मा पंचाल केवळ वृत्तपत्र नव्हे, तर समाजप्रबोधनाचे विचारपत्रक जे प्रत्येक समाजबांधवाच्या घरी पोहचलेच पाहिजे!**


REGD.NO.: MCE/215/2022-24 ☯ वर्ष १३ ☯ अंक १० ☯ मार्च २०२४ ☯ मुंबई ☯ पृष्ठे - ४ ☯ मुल्य २रु.


## संगमेश्वर येथे भव्य वधू-वर मेळावा संपन्न !




विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संचालित विश्वकर्मा पंचाल वधू वर सूचक केंद्र आयोजित तसेच विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जिल्हा रत्नागिरी व शाखा संगमेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वधू वर मेळावा रविवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ रोजी शुभगंधा मंगल कार्यालय मयूरबाग, संगमेश्वर जिल्हा रत्नागिरी येथे श्री. मुरलीधर वि. बोरसुतकर माजी अध्यक्ष विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघ यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

यावेळी प्रमुख उपस्थिती मा. सदानंद द. नगरकर अध्यक्ष विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघ, श्री. विष्णू न. सागवेकर सरचिटणीस विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघ, तसेच संजय बा. देवरुखकर अध्यक्ष विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था रत्नागिरी जिल्हा.

प्रथम मान्यवरांचे शाब्दिक स्वागत करून आरंभी उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून विश्वकर्मा महाराज तसेच संत नरहरी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघाच्या सदस्या सौ संध्या सं देवरुखकर यांनी "ओमकार प्रधान रूप गणेशाचे" या ईशस्तवनाने कार्यक्रमाचा शुभारंभ केला. विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जिल्हा रत्नागिरी या संस्थेचे सरचिटणीस श्री मंगेश र. सागवेकर यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळली. सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्याची जबाबदारी विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जिल्हा रत्नागिरी यांचे अध्यक्ष श्री संजय बा. देवरुखकर यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघाचे माजी अध्यक्ष श्री मुरलीधर वि. बोरसुतकर, मा. सदानंद द. नगरकर अध्यक्ष विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघ व श्री. विष्णू न. सागवेकर सरचिटणीस तसेच विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती रत्नागिरी जि. संस्थेचे अध्यक्ष श्री संजय बा. देवरुखकर यांचे शाल श्रीफळ व पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

मुंबईसह बोरिवली, पनवेल, रायगड,

(पुढील वृत्त पान ३ वर....)

## वि. सु. समाज मुंबई महिला संघटनेतर्फे हळदीकुंकू समारंभ संपन्न



विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई महिला संघटनेतर्फे हळदीकुंकू समारंभ आणि मराठमोळा फॅशन वॉक स्पर्धा दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी अध्यक्षा श्रीमती अनिता प्रमोद सागवेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सौ. संध्याताई बहाडकर–वैती (साहित्यिका) संपादिका दैवज्ञ प्रबोधिनी तसेच मा.सौ. प्रियाताई सरवणकर महिला विभाग प्रमुख माहीम दादर विधानसभा व सौ. रश्मी सहस्त्रबुद्धे या परीक्षक म्हणून लाभल्या.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. रसिका रघुनाथ नगरकर यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून त्यांना व्यासपीठावर आमंत्रित केले. त्यानंतर विश्वकर्मा महाराज, संत नरहरी महाराज यांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सौ.रसिका र. नगरकर आणि सौ. विभा गणेश सागवेकर यांनी ईशस्तवन सादर करून प्रसन्न वातावरण निर्माण केले. त्यानंतर उपस्थित मान्यवर विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघाचे अध्यक्ष मा.

(पुढील वृत्त पान ४ वर....)

## श्री विश्वकर्मा डेव्हलपर्स कोलाड येथे २० गुंठे जागेत भूमिपूजन सोहळा संपन्न



श्री विश्वकर्मा डेव्हलपर्स आणि मौजे कोलाड ग्रामपंचायतचे मा.सरपंच श्री. रविंद्र बंडू सागवेकर यांच्या सौजन्याने विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेला देण्यात आलेल्या २० गुंठे जागेत मंगळवार दि.२७/०२/२०२४ रोजी सकाळी अकरा वाजता भूमिपूजन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

पुरोहितांनी संस्थेचे अध्यक्ष श्री.संजय स.देवरूखकर,महासंघ अध्यक्ष श्री.सदानंद द.नगरकर उभयता, संस्थेचे सरचिटणीस श्री.मोहन ह.नगरकर उभयता,संस्थेच्या कार्याध्यक्षा सौ. वैशाली वि. करंजवकर उभयता, कोलाडचे श्री.रविंद्र बं. सागवेकर उभयता यांच्याकडून यथाविधी पूजन केले. यावेळी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य श्री.दिलीप भा.देवरूखकर, महिला अध्यक्षा श्रीमती अनिता प्र. सागवेकर, सेक्रेटरी श्रीमती श्रद्धा सं.सागवेकर, उपसेक्रेटरी सौ.रसिका र. नगरकर, उपखजिनदार सौ.विभा ग.सागवेकर, श्रीमती शकुंतला शां. पालकर, सदस्या सौ.स्मिता स.नगरकर,सौ.मिनल मो. नगरकर,युवामंच सेक्रेटरी श्री.अतुल रा.देवरूखकर, संस्थेचे सदस्य श्री.विलास करंजवकर उपस्थित होते.

## पोलादपूर येथे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न




विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज पोलादपुर मंगळवार दिनांक २७ मंगळवार २०२४ रोजी श्री संत शिरोमणी नरहरी महाराज याचा पुण्यतिथी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील श्री गंगामाता सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती. या पुण्यतिथी सोहळयाकरीता प्रमुख पाहुण्या म्हणून विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई, संचालित महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती अनिता प्रमोद सागवेकर, विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघाचे अध्यक्ष श्री. सदानंद दत्तात्रय नगरकर व महासंघाचे इतर पदाधिकारी व महिला पदाधिकारी, विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार युवामंचचे अध्यक्ष श्री. संदीप पालकर, सुवर्णकार संघटना अध्यक्ष श्री. दिपक पालकर तसेच समाजातील इतर मान्यवर व समाज बांधव

(पुढील वृत्त पान ३ वर....)

## कोल्हापूर येथे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न

मंगळवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी श्री विश्वकर्मा सुवर्णकार समाज संस्थेच्या वतीने श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची ७३८ पुण्यतिथी फुलेवाडी बापूसो कसबेकर हॉलमध्ये साजरी करण्यात आली पुण्यतिथीनिमित्त सकाळी कुंकूमार्चनमध्ये ७५ महिलांनी सहभाग घेतला. त्यानंतर महाराजांच्या प्रतिमेचे ज्येष्ठ नागरिक डॉ. एम.बी पोतदार, पी.के. पोतदार, मारुती पोतदार, दिनकर पोतदार, मनोहर पोतदार शिवाजी पोतदार, रामचंद्र पोतदार (मुंबई) पंडित पोतदार, आनंदा पोतदार, नंदू पोतदार अण्णासो पोतदार या सर्वांच्या हस्ते फोटो पूजन करून सोहळ्याला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर वार्षिक अंक पुस्तक प्रकाशन व महाराजांचा फोटो असलेला कॅलेंडर २०२४ चे प्रकाशन करण्यात आले व शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव व विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमांमध्ये करण्यात आला त्यानंतर आरोग्य शिबिर स्वस्तिक हॉस्पिटलचे हार्ट तपासणी मध्ये शंभर पेक्षा जास्त समाज बांधवांनी सहभाग घेतला. इचलकरंजी येथील डॉक्टर कोळेकर यांच्यामार्फत डोळे तपासणी मध्ये १३० लोकांनी सहभाग घेतला अर्पण ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिर घेण्यात आले त्यामध्ये पन्नास लोकांनी रक्तदान केले उपस्थित ज्येष्ठ नागरिकांचा

(पुढील वृत्त पान ३ वर....)

## वि.सु. समाज, (मुंबई) संलग्न दिवा-डोंबिवली, कल्याण-भिवंडी ते कर्जत-कसारा विभागीय संस्थेचे ८ वे वार्षिक स्नहेसंमेलन व महिलांचा हळदी-कुंकू समारंभ उत्साहात संपन्न




वि.सु. समाज, (मुंबई) संलग्न दिवा-डोंबिवली, कल्याण-भिवंडी ते कर्जत-कसारा विभागीय संस्थेचे ८ वे वार्षिक स्नहेसंमेलन व महिलांचा हळदी-कुंकू समारंभ दि. १८ फेब्रू. रोजी सायं. ठिक ४.३० ते ८.०० या वेळेत वक्रतुंड सभागृह, गणेश मंदिर, फडके रोड, डोंबिवली (पूर्व) येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

अध्यक्ष श्री. सुरेश शांताराम पालकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ज्येष्ठ व श्रेष्ठ मान्यवरांना पुढे बोलावून श्री देव विश्वकर्मा, संत शिरोमणी नरहरी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज व आपले आराध्य दैवत श्री गणेशाच्या प्रतिमांचे पुजन केले. दिपप्रज्वलन करुन सर्व मान्यवर व्यासपिठावर स्थानापन्न झाले. या नतंर अध्यक्षांनी मान्यवरांची ओळख करुन दिली. त्यात श्री. दत्ताराम केशव देवरुखकर, श्री सुरेश शंकर सागवेकर, श्री सत्यवान शांताराम पालकर, श्री दत्तात्रय मोतीराम नगरकर, श्री मिलिंद दत्तात्रय करंजवकर व श्री पांडुरंग विश्राम वारणकर हे संस्थेचे पदाधिकारी होते.

सौ. एकता ए. पालकर व सौ. प्रियांका वारणकर यांनी ईशस्तवनपर गीत सादर केल्यानंतर अध्यक्षांनी सचिव श्री पांडुरंग वि. वारणकर यांना अहवाल वाचन करण्यास विनंती केली, त्याप्रमाणे संविधानी वर्षभरातील घडामोडीवर भाष्य करत अहवाल सादर केला. या अहवालात त्यानी संस्था राबवत असलेल्या वेगावेगळ्या उपक्रमांची माहिती दिली. उदा श्रावण्या, महिलांचा भोंडला. पावसाळी सहल, विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिबीर आणि कॅलेंडर प्रकाशन इत्यादी.

यानंतर अध्यक्षांच्या आणि सगळ्या कार्यकर्त्यांच्या हस्ते व्यासपिठावरील मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. त्यानंतर अध्यक्ष श्री सुरेश शां.

(पुढील वृत्त पान ३ वर....)

### आतील पानात......


- वि.सु.समाज मुंबई आणि पुणे ज्ञाती संस्थेतर्फे सामुदायिक मौजीबंधनसाठी जाहिर आवाहन...
- विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादित निवडणुकीसाठी जाहिर आवाहन...

## विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई च्या वतीने सामुदायिक मौजीबंधनसाठी जाहिर आवाहन!

यंदा विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेच्या वतीने रविवार दि.२८ एप्रिल २०२४ रोजी सामुदायिक मौजीबंधन सोहळा आयोजित केला आहे. त्यानुसार ज्या सभासदांस आपल्या मुलांची मुंज (उपनयन संस्कार ) करण्याची इच्छा असल्यास, लवकरात लवकर संस्थेकडे नोंदणी करावी. **प्रत्येक बटूस रुपये ३,५००/- वर्गणी आकारण्यात येत आहे.**

मौजीबंधन नावे नोंदणीसाठी खालील संबंधित कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा अन्यथा दादर पश्चिम येथे संस्थेस भेट द्यावी .

सदानंद द. नगरकर (जोगेश्वरी) ९८२०८३२८००
विनायक रा. सागवेकर (ठाणे) ९९८७२०१०५१
संजय स.देवरूखकर (बोरीवली) ९६१९३५८८९९
उदय रा.सागवेकर (ठाणे) ८२९१६६४०९९
मनोहर ल.पालकर (काळाचौकी) ९८६९५०५७६६
विलास वि.वाडेकर (काळाचौकी) ९८२०७७८०८२
संतोष वि.देवरुखकर (दादर) ८८५०१ २८१७२
प्रकाश अ.वाडेकर (कल्याण) ९८३३३१४१६१
दिपक र.सागवेकर( ठाणे) ९८९२६८२३४४
अशोक र.पालकर (कांजुरमार्ग) ९३२३२८७३४१
सुहास बसणकर (घाटकोपर) ९८७०७०३२३९
विलास गो.नगरकर (अंधेरी) ९८६९९६४९८४
रमाकांत कृष्णा पालकर (मालाड) ९८९२१८७९४३
मंगेश र.पालकर (गोवंडी) ९९७५०६३३७३
भरत र.सागवेकर (वरळी) ९८२१६५१८३९

**मौजीबंधन सोहळा ठिकाण**
डॉ. धर्माजी हरी खरुडे मंडई सभागृह, पहिला माळा, आदर्शनगर, साईदत्त सेवा मंडळासमोर,वरळी फायर ब्रिगेडजवळ, सेंच्युरी बाजार, वरळी कॉलनी, मुंबई ४०००३०

**आपले सहकार्य हेच संस्थेच्या यशाचे रहस्य.**

आपले स्नेहांकित,

**श्री.संजय स. देवरुखकर** (अध्यक्ष)
**श्री.मोहन ह. नगरकर** (सरचिटणीस)

## ❁ हार्दिक अभिनंदन ❁

## श्री सुनील वसंत सागवेकर यांची SEO पदी निवड

श्री सुनील वसंत सागवेकर (फणसट तालुका संगमेश्वर) यांची जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडून विशेष कार्यकारी अधिकारी (SEO) पदी निवड करण्यात आली.
श्री सुनील सागवेकर यांची सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. श्री. रवींद्र चव्हाण साहेब, रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा प्रमुख श्री प्रमोदजी जठार, चिपळूण संगमेश्वर विधानसभा प्रमुख श्री प्रमोदजी आधट राव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अध्यक्ष श्री रुपेशजी कदम यांनी शिफारस केली होती. फणसट सारख्या गावात हे पद मिळाल्याने नागरिकांची मोठी सोय होणार आहे. सुनील सागवेकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन



**रचना ससंद इन्टीरियर अँड आर्किटेचर कॉलेज क्रिकेट मॅच विनर २०२४ सुनीत सुधीर चिखलकर**

### श्री.दिपक पोतदार यांचा जनसंज्ञापन व वृत्तपत्र विद्या व्दितीय वर्षात प्रथम क्रमांक



जनसंज्ञापन व वृत्तपत्र विद्या व्दितीय वर्षात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल कोल्हापूर संस्थेचे इचलकरंजी येथील समाज बांधव श्री.दिपक पोतदार (तिसंगीकर) यांचा देशभक्त बाबासाहेब खंजीरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुण खंजीरे यांचे हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. अविनाश सुरेश देवळेकर परीवार, सांगली व श्री विश्वकर्मा सुवर्णकार समाज, सांगली संस्थेच्या वतीने आपले हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!



पवित्र पोर्टल शिक्षक पद नियुक्तीसाठी शिफारसपात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी जाहीर झाली. यामध्ये अनुराधा महेश पोतदार रत्नागिरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून निवड झाली आहे. आपले हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!

## श्री.संजय रं. पोतदार आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित




पेठवडगाव येथे श्री.बळवंतराव यादव ज्युनिअर कॉलेज याठिकाणी सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत असणारे श्री.संजय रंगनाथ पोतदार (येळापूरकर) यांना मिणचे, कोल्हापूर येथील आनंदगंगा फाऊंडेशनच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात करत असलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. श्री विश्वकर्मा सुवर्णकार समाज, सांगली संस्थेचे वतीने मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा!
अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य, सर्व समाज बांधव-भगिनी श्री विश्वकर्मा सुवर्णकार समाज, सांगली

## श्री.अशोक का. नगरकर यांचा भुलेश्वरवाडी येथे सत्कार




नवतरूण मित्र मंडळ, ग्रूप नं.१,भुलेश्वरवाडी संलग्न महिला मंडळ आयोजित श्री सत्यनारायणाची महापूजा तसेच हळदीकुंकू समारंभ व विद्यार्थी गुणगौरव समारंभानिमित्त सोहळ्यात मुंबई संस्थेचे हरहुन्नरी जोगेश्वरी विभाग प्रमुख श्री.अशोक काशिराम नगरकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## खेड तालुक्यात संत श्री नरहरी सोनार महाराज पुण्यतिथी साजरी



खेड तालुक्यातील श्री संत नरहरी सोनार महाराज पुण्यतिथी दि २७/०२/२४ रोजी समाजाच्या हॉलमध्ये साजरी करण्यात आली. त्या प्रसंगी मोठ्या संख्येने समाजबांधवानी आपली उपस्थिती दाखवून महाराजांचे आशीर्वाद घेतले. यावेळी समाजाचे अध्यक्ष श्री भास्कर म. पालकर, सौ स्नेहल पालकर, श्री प्रकाश देवरुखकर,खेड तालुका पतसंस्था अध्यक्ष श्री रमेश सागवेकर, श्री विजय करंजवकर, श्री सुभाष देवरुखकर,श्रीसंतोष वारणकर, श्री उमेश देवरुखकर, श्री संतोष देवरुखकर, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम पालकर, श्री प्रदीप सागवेकर, श्री केशवशेठ पालकर, श्री अनिल पालकर, श्री अभिषेक पालकर, श्री अर्जुन सागवेकर, खजिनदार श्री मंगेश सागवेकर, खेड तालुका प्रसिद्धी माध्यम प्रमुख श्री वैभव सागवेकर उपस्थित होते.

## रायगड जिल्हा ग्रंथालय संघातर्फे सौ.किर्ती मंगेश नगरकर यांचा सन्मान





रायगड जिल्हा ग्रंथालय संघातर्फे सौ.किर्ती मंगेश नगरकर यांचा सन्मान तालूका वाचनालय पोलादपूर आधुनिक भारतीय ग्रंथालयाच्या विकासात डॉ. एस.आर. रंगनाथन यांचे फार मोठे योगदान आहे. देशातील सर्व सामान्यांना ज्ञानाची कवाडे विनामूल्य खुली करण्याचा विचार सर्व प्रथम डॉ. एस.आर रंगनाथन यांनीच रुजविला व ते जोपासण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजविले. त्यांचा हा वारसा पुढे घेवून जाताना सौ.किर्ती नगरकर यांनी रायगड जिल्हा ग्रंथालय चळवळीतील ग्रंथालयीन कर्मचारी म्हणून वीस वर्षांपेक्षा जास्त सेवा वाचकांना देवून उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल दि.११ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.




## आजीवन सभासदांचे हार्दिक स्वागत !



**श्री. नंदकुमार धोंडू देवरुखकर**
**पत्ता -:** घर नं. ३२४, साखर बामणवाडी, ता. खेड, जि. रत्नागिरी - ४१५७१८
**मोबाईल क्र.** ८५९१२५५९४०



**श्री. संतोष मारुती देवरुखकर**
**पत्ता -:** मु. नागावे, पो. अलोरे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, ४१५६०३
**मोबाईल क्र.** ९७६३७४५७०९ / ७०६६४५७४१४



**कु. सागर अशोक सागवेकर**
**पत्ता -:** मु. पो. खरवते, (वरची वाडी) ता. चिपळूण, जि. रत्नागिरी - ४१५७०१
**मोबाईल क्र.** ९९२१६८७९९०



**कु. कल्पेश अशोक सागवेकर**
**पत्ता -:** मु. पो. खरवते (वरची वाडी) ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. ४१५७०१
**मोबाईल क्र.** ९९६७९६९९०९



**श्री. समीर दत्ताराम करजीवकर**
**पत्ता -:** मुक्ताई पार्क सहकारी देखभाल संस्था, फ्लॅट नं. ४०४, चौथा माळा, सर्वे नं. ७५/५/१ ए, रायकर मळा, धायरी, पुणे. पिन कोड- ४११०४१
**मोबाईल क्र.** ७८२२९८४४८२



**श्री. दिनकर पांडुरंग पोतदार**
**पत्ता -:** मु. पो. शिवारे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर- ४१६२१४
**मोबाईल क्र.** ९९२२१९३३८९ /९७६३६५७२६६



**श्री. मनोहर गजानन खोत**
**पत्ता -:** समीर अपार्टमेंट, रु.नं.३/४, भुसार मोहल्ला, कुंभारवाडा, एम. जी. रोड, पनवेल- ४१०२०६
**मोबाईल क्र.** ९८६७२३५०७०



**श्री. हेमंत पांडुरंग देवरुखकर**
**पत्ता -:** श्रीगणेश अलंकार, पितृछाया चाळ, आनंदनगर, मालाड पूर्व मुंबई- (आप्पापाडा) ४०००९७
**मोबाईल क्र.** ९८७०२२८४४० ९८१९९१४६९८

# वि. सु. समाज मुंबई महिला संघटनेतर्फे हळदीकुंकू समारंभ संपन्न




(वृत्त पान १ वरुन)
श्री. सदानंद दत्तात्रय नगरकर, विश्वकर्मा सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष श्री संजय सखाराम देवरुखकर, संस्थेच्या कार्याध्यक्ष सौ.वैशाली विलास करंजवकर, युवामंच अध्यक्ष श्री. गणेश दत्तात्रय सागवेकर तसेच सरचिटणीस श्री अतुल रामचंद्र देवरुखकर, मीरारोड - डहाणू संलग्न शाखेचे अध्यक्ष श्री. रोहिदास हरिश्चंद्र नगरकर यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर महासंघाचे अध्यक्ष सदानंद द. नगरकर यांनी सर्व उपस्थित समाज भगिनी व मान्यवरांचे कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले व महिला संघटनेतर्फे होणाऱ्या नवनवीन कार्यक्रमाबद्दल माहिती सांगून त्यांच्या बहुमूल्य योगदानाबद्दल महिला कार्यकर्त्यांचे भरभरून कौतुक केले. तसेच अध्यक्ष श्री. संजय सखाराम देवरूखकर यांनी महिला कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याबद्दल कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर युवामंच सेक्रेटरी अतुल रामचंद्र देवरुखकर यांनी देखील महिला संघटनेला शुभेच्छा दिल्या तसेच या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे सौ संध्या बहाडकर यांनी महिलांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. आपण स्त्री आहोत आणि हा कार्यक्रम सभा नसून सेलिब्रेट करण्याकरता आहे तसेच देवाने सृष्टी निर्माण केली तेव्हा पुरुष निर्मिती केली तसेच स्त्री निर्मिती करिता सूर्याकडून प्रकाशकिरणे घेतली, चंद्राकडून शितलता घेतली, सशाचा भित्रेपणा घेतला, वाघाची उग्रता, गवताचा कापरेपणा घेतला, गायीची वात्सल्यता घेतली, हरणाची चंचलता घेतली, मोराचा डौलदारपणा, मनाचे माधुर्य, सर्पाचे विष घेतले. या सर्व मिश्रणाने स्त्रीची निर्मिती झाली. असा स्त्रीच्या निर्मितीचा उल्लेख त्यांनी केला. तसेच सरकारी नोकरीमध्ये आपली मुलं असली पाहिजेत त्यासाठी तुम्ही या परीक्षेच्या तयारी करून त्याकरिता भावना व्यक्त केल्या. त्यानंतर मराठमोळ्या फॅशन वॉकला सुरुवात करण्यात आली. यामध्ये महिलांनी सहभाग घेतला. त्यामध्ये अंतिम दोन विजेत्यांची नावे घोषित करण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक सौ वैशाली विलास करंजवकर (जुईनगर) तर द्वितीय क्रमांक सौ. प्रांजल प्रशांत वारणकर (दादर) यांनी पटकावले. या दरम्यान उपस्थित समाजभगिनींना हळदीकुंकू व वाण दिले. या कार्यक्रमासाठी प्रथम पारितोषिक ३०००/- रोख रक्कम ही श्रीमती दर्शना दत्तात्रय सागवेकर यांच्या वाढदिवसानिमित्त देण्यात आली होती व द्वितीय पारितोषिक हे २००१/- रुपये रोख रक्कम ही महिला संघटनेतर्फे देण्यात आली होती. त्यानंतर महिला संघटनेच्या कार्यक्रमासाठी ज्यांनी आजपर्यंत काम केले अशा तेजस्वी कार्यासाठी व महिला संघटनेचे कार्य उज्वल केल्याबद्दल त्यांना यावर्षी तेजस्विनी या पुरस्काराने सन्मानित केले. यामध्ये एकूण ३५ महिलांचा समावेश होता. कार्यक्रमाची सांगता व कार्यक्रमासाठी ज्यांनी जागेसाठी व्यवस्था करून दिली त्या प्रिया ताई सरवणकर तसेच साऊंड वाले दादांचे या कार्यक्रमास सहकार्य लाभले त्या सर्व व्यक्तींचे आभार मानून सांगता करण्यात आली.

## नंदू पोतदार,पोर्लेकर श्री संत नरहरी सोनार महाराज पुण्यतिथी साजरी



नंदू पोतदार,पोर्लेकर यांचे घरची पूजा असे कार्य घरोघरी जेव्हा सुरू होईल त्यावेळी समाज प्रगल्भ झालेला दिसू लागेल. दरवर्षी आपण व आपले कुटुंबीय ज्या भक्तीभावाने आपल्या घरात, प्रत्येकाच्या मनात पुण्यतिथी व जयंती साजरी करता हे समाजासाठी आदर्श निर्माण करीत आहात.




**श्री. विलास दत्ताराम देवरुखकर**
गणपतीपुळे रत्नागिरी राजवीलास गाईड सेंटर अँड बुक स्टॉल. मोबाईल. ८६०००५४१४०
१२ फेब्रुवारी
सुख, समृद्धी, समाधान, दिर्घायुष्य, आरोग्य आणि सर्व स्वप्ने पूर्ण होवो तुमची!
अभिष्टचिंतन ६५ व्या वर्षात पदार्पण
निमित्त हार्दिक शुभेच्छा !


## विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादित

५ सय्यद अली चाळ, जमील नगर, भांडुप (प.), मुंबई - ४०००७८.
दूरध्वनी: ०२२ २४३७ ५३२९ email ID : vishwakarmapatpedhi@gmail.com

### जाहीर आवाहन

विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादितच्या सर्व सभादांना कळविण्यात येते की, पतसंस्थेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ मार्च २०२२ रोजी संपला असून याची सूचना या अगोदरच मासिकात जाहीर करण्यात आली होती. कोविड महामारीमुळे निवडणूक घेणे सहकार खात्यास शक्य झाले नाही. परंतु या चालू वर्षामध्ये आपल्या पतसंस्थेची संचालक मंडळाची निवडणूक कधीही जाहीर होऊ शकते. तत्पूर्वी इच्छुक उमेदवारांनी पतसंस्थेच्या कार्यालयात संपर्क साधावा.

आपले नम्र,
श्री. मनोहर ल. पालकर
(अध्यक्ष)
**विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादित**

## भावपूर्ण श्रद्धांजली !



**रत्नागिरी** - विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज महासंघाचे उपाध्यक्ष श्री. गणेश निळकंठ पाचेरकर यांच्या चुलत बहीण **श्रीमती आशा उर्फ नयना निळकंठ करंजवकर (कासारवेली)** सध्या रा. साधना अपार्टमेंट, जोशी पाळंद, रत्नागिरी यांचे दि. ९ फेब्रुवारी २०२४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.



**वाकोला** - सांताकृझ येथील समाजबांधव श्री. रमेश ना.सागवेकर यांचे वडिल **श्री.नारायण महादेव सागवेकर** यांचे दि.१८/०२/२०२४ रोजी आकस्मित निधन झाले.



**नवसारी** - सुरत येथील ज्येष्ठ समाज बंधू **श्री शाम भास्कर सागवेकर** वय ७० वर्ष ( गाव सोल्ये, ता. राजापूर) यांचे दि. १८/०२/२०२४ रोजी नवसारी येथे दिर्घ आजाराने दुख:द निधन झाले. ते वि. सु. समाज मुंबई संचालित युवामंचचे दिनेश प्रभाकर सागवेकर व श्री राजेश वसंत सागवेकर यांचे काका होते.



**पुणे** - सुवर्णकार ज्ञाती संस्थेचे ज्येष्ठ सदस्य **श्री दिलीप रघुनाथ सागवेकर** यांचे दि.२०/०२/२०२४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.



**पुणे** - श्री सुवर्णकार ज्ञाती संस्थेचे व आपले समाज बांधव श्री संदीप लक्ष्मण वारणकर राहणार वारजे माळवाडी यांच्या मातोश्री **श्रीमती आशा लक्ष्मण वारणकर** यांचे दिनांक २२/२/२०२४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.



**कळस-** विश्रांतवाडी पुणे येथील समाजभगिनी **कु.सपना प्रभाकर पंडित** यांचे दि.२६/०२/२०२४ रोजी वयाच्या ४३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.



**बोरिवली** - श्री संत नरहरी सुवर्णकार समाज, बोरिवली -मुंबई या संस्थेचे जेष्ठ कार्यकर्ते **श्री अनंत चंद्रु देवरूखकर** यांचे दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी दु:खद निधन झाले आहे.



**चिपळूण** - येथील जेष्ठ समाजबांधव श्री.यशवंत(आण्णा) शंकरशेठ पालकर यांच्या पत्नी **सौ.उषा यशवंत पालकर** यांचे दि.२८ फेब्रुवारी २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. रत्नागिरी जिल्हा संस्थेचे माजी पदाधिकारी कै.बाप्पाशेठ पालकर यांची भावजय होती.

## मालकी हक्कासंबंधी तपशील (फॉर्म ४ नियम ८ प्रमाणे)

### विश्वकर्मा पंचाल

१) प्रकाशन स्थळ - मुंबई
२) प्रकाशन अवधी - मासिक
३) मुद्रकाचे नाव - श्री. सुनिल दत्ताराम देवरुखकर
अे-२/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, (चिंचपोकळी, पुर्व), काळाचौकी, मुंबई -४०००३३ (महाराष्ट्र)
४) प्रकाशकाचे नाव - श्री. सुनिल दत्ताराम देवरुखकर
अे-२/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, (चिंचपोकळी पुर्व), काळाचौकी, मुंबई -४०००३३ (महाराष्ट्र)
५) संपादकाचे नाव - श्री. सुनिल दत्ताराम देवरुखकर
अे-२/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, (चिंचपोकळी, पुर्व), काळाचौकी, मुंबई -४०००३३ (महाराष्ट्र)
६) नागरिकत्व : भारतीय
७) ज्या व्यक्ती या पत्राच्या मालक आहेत अथवा भाग धारण करणारे भागधारक अगर व्यक्ती यांची नावे व पत्ते लागू नाही. कारण हे पत्र विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई (रजि.) या संस्थेच्या मालकीचे असून संस्थेला सभासद आहेत.

**नोंदणीकृत कार्यालय:**
अे-२/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, (चिंचपोकळी, पुर्व), काळाचौकी, मुंबई -४०००३३ (महाराष्ट्र)

मी असे जाहीर करतो की, वर उद्‌धृत केलेला तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार सत्य आहे.

श्री. सुनिल दत्ताराम देवरुखकर
(प्रकाशकाची सही) ०७ - ०३ -२०२४


## विश्वकर्मा पंचाल चे आजीवन सभासद व्हा

आजीवन सभासद मुल्य १,०००/- (एक हजार रुपये मात्र) रोख अथवा चेक, डी.डी. **"Vishwakarma Panchal"** या नांवे द्यावा, खालील खात्यावर ट्रान्स्फर करावेत. यासाठी पुर्ण नांव व पुर्ण पोस्टल पत्ता पीन कोड सह, दुरध्वनी तसेच मोबाईल क्रमांक, सोबत एक फोटो पाठवावा.
**Bank Name: Saraswat Co-op. Bank Ltd., (saving Account)**
**Branch- MadhuKendra, Dadar (w.),Mumbai,**
**A/c. No: 006200102908646, IFSC Code: SRCB0000006**

स्कॅन करा आणि पैसे पाठवा.


## स्व.भार्गव शंकर सागवेकर

**स्व.आई व स्व.दादांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !**



मुर्तिमंत वात्सल्याची,
आम्ही घेतली अनुभुती,
आजही तुझ्या स्मृती,
नयनी दाटूनी येते पाणी!

आपले,
श्री. सुनिल भार्गव सागवेकर
सौ. प्रिती, श्रीमती अनिता,
कु.अंकीत, कु.मृणाली, कु.जित

## सागवेकर ज्वेलर्स

१२९, सीता सदन, दुकान नं.१, बॉम्बे बझारच्या समोर, जे.पी. रोड, अंधेरी (प.), मुंबई - ५८. टेलि. : २६७७५७०५

## सागवेकर तारपाटा

गीता इस्टेट, जय प्रकाश रोड, अंधेरी (प.), मुंबई - ५८. फोन : ६७७४५७०

- - - - - - - - - - - - - - - -

निवास: बि-१०३, दिपाली को.ऑ.हौ. सोसायटी, बि.नं.३८, आझाद नगर, वि. रा.देसाई रोड, क्रिडा संकुलमागे, अंधेरी (प.), मुंबई -५३. टेलि.: २६७३४५७४, २६७७०४१६, ९३२२२७२६०१



**विश्वकर्मा पंचाल**
मालक
**विश्वकर्मा सुवर्णकार समाज** (रजि.) मुंबई
३५६ डब्ल्यु ८, चोकशी बिल्डींग, रानडे रोड, दादर (प), मुंबई-२८, ☎२४३७ ५३२९

**-: नोंदणीकृत कार्यालय :-**
अे-२,/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, काळाचौकी, मुंबई-३३

**प्रकाशक - मुद्रक - संपादक**
**श्री. सुनिल दत्ताराम देवरुखकर**

**-: पत्रव्यवहार :-**
एस-२,श्री कृपा, डॉ.आंबेडकर रोड, समर्थ हनुमान पथ, काळाचौकी, (चिंचपोकळी, पू.) मुंबई -३३.
संपर्क : ८६८९८ ७२३५२ व्हॉट्स ॲप
E-mail: vpmonthly@gmail.com
prasadart29@gmail.com

**-: उपसंपादक :-**
श्री. सुनिल स. सागवेकर - ७७३८०४९२०३
श्री. मोहन ह. नगरकर - ९८६९६६९०२०
श्री. अतुल रा. देवरुखकर - ९८३३६५५०८९

**-: सहा.संपादक :-**
श्री. मनोहर म. सागवेकर (पुणे) - ९९६०४३६७०९
श्री. संदिप वि. वाडेकर - ९८१९६३०२८५
श्री. गणेश द. सागवेकर - ९२२१६७२२९९
कु. शुभम रा. सागवेकर - ८२९१८६९०२२
कु. ओमकार सु. सागवेकर - ९१६७३३९८२०
श्री. आशिष अ. पालकर - ७७१८९४९८३०

**सल्लागार:**
**श्री. संजय सखाराम देवरुखकर**
(अध्यक्ष - विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई)
**श्री. सदानंद द. नगरकर**
(अध्यक्ष - वि.पं.सु.समाज महासंघ )

**कायदेविषयक सल्लागार**
**ॲड. सौरभ नरेंद्रकुमार देवरुखकर**- B.L.S., L.L.M

**विश्वकर्मा पंचाल वधुवर सुचक प्रमुख**
**श्री. पद्माकर बापुशेठ नगरकर**
**संपर्क : ०२२२३७१७५४९, ९९६९६३४६८३**



हे मासिक **मालक विश्वकर्मा सुवर्णकार समाज(रजि.) मुंबई**, चोकशी बिल्डींग, रानडे रोड, दादर (प), मुंबई - ४०००२८, ☎०२२ २४३७५३२९ यांचेसाठी **प्रकाशक-मुद्रक श्री. सुनिल देवरुखकर** यांनी **प्रसाद आर्ट**, एस-२, श्री कृपा, डॉ. आंबेडकर रोड, (चिंचपोकळी, पुर्व) काळाचौकी, मुंबई -४०००३३. येथे छापून अे-२/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, (चिंचपोकळी, पुर्व), काळाचौकी, मुंबई -४०००३३ येथून प्रकाशित केले.
**संपादक: सुनिल दत्ताराम देवरुखकर, भ्रमणध्वनी - ८६८९८७२३५२ । टीप : वृत्तपत्रातील बातम्या अथवा मजकूराशी संपादक अथवा संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**
**कृपया आपल्या बातम्या व फोटो vpmonthly@gmail.com या ईमेलवर अथवा "विश्वकर्मा पंचाल" या व्हॉट्सअप ग्रुपवर पाठवाव्यात.**